# मी वनवासी

(आत्मचरित्र)

सौ. सिंधूताई सपकाळ

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A 134

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**मी वनवासी : सौ. सिंधूताई सपकाळ**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १३०/-

# मी वनवासी

दुर्दैवाच्या भोवऱ्यात अचानक सापडलेल्या

जीवनाच्या जळत्या निखाऱ्यावरून चालणाऱ्या

नियतीच्या जबड्यात हात घालून

दात मोजणाऱ्या

रणरागिणींना सादर समर्पण

मंत्री
वित्त आणि नियोजन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : 30 एप्रिल 1991

आपली अचानक भेट झाली, व आपण दिलेलं, **"मी वनवासी"** पुस्तक वाचलं –
– आणि वाटलं कीं,

माणसांतील पशूवत अनुभवानं अगतिक झालेली स्त्री –
विफलतेनं, मृत्यूला सामोरी जाण्याचा विचार करते न करते तोच –
जन्माला घालणा–या भाग्यविधात्यानच अभागी ठरविलेल्या,
तान्हुल्याच्या घातलेल्या सादानं, नियतीशी टक्कर देण्यासाठी उभी ठाकते.
– तेव्हा मातृत्व आसमंतात व्यापून यशाची क्षितीजं माणसाच्या हातात देतं –
नियती मातृत्वापुढे नतमस्तक होते !

कांही कालावधी लोटतो न लोटतो तोच –
त्याच मातेची माता परिस्थितीला शरण जावून नवमातृत्वाला घराबाहेर हाकून
खडकाळ मार्ग पत्कर.या.,लावते तेव्हा – तेच – यशाचं क्षितीज
माणसाकडून नियतीकडे जातं ! नियतपुढं मातृत्व पराभूत होतं !!

अशा एक नव्हे अनेक विरोधाभासानं सामान्य वाटणा–या सिंधूला – दुःखाच्या – अन्यायाच्या छिन्नीनं
जेव्हा नियतीनं घडविलं, तेव्हाच
आजची असामान्य व्यक्तिमत्वाची समाजसेविका घडलेली आपल्याला दिसते.

– सिंधूताईचं आत्मचरित्र हे केवळ त्यांचं राहत नाही, तर –
नियतीच्या भोव–यात अडकलेल्या प्रत्येक अभाग्याला प्रेरणा देणारं प्रेरणास्त्रोत ठरतं !

– बाभळीच्या काटयात रुतलेल्या चिमणीच्या पिल्लाला चोचीनं पाणी पाजणारा कावळा जेव्हा
सिंधुताईंना दिसतो तेव्हा –
तो पक्षी नसतोच तर – तो असतो, नियतीचा संदेश......

बाई ग ! तू कितीही दुःख भोगलेली असशील तरी ह्या नराधमांच्या वाळवंटात माणुसकीचा हिरवळ,
मी असाच जागोजागी पेरून ठेवलेला आहे, तो शोध !
तू दुःख विसरशील ! तोच तुलाआत्मविश्वासानंदेईल !

उठ ! मीच दिलेल्या आत्मविश्वासानं, माझ्याशीच लढायला सिध्द हो.

नियतीशी एकटयानं लढत देण्याची दुर्दम्य इच्छाशक्तीमुळं, सिंधुताईच्या कार्यामुळं...
कित्येक आदिवासींचे, दीनदुबळयांचे अश्रु पुसले गेले आहेत – हे तर वर्तमान आहेच पण – त्यांनी लिहिलेलं आत्मचरित्र
सामान्याच्या मनात असामान्यत्व चेतविणारं स्फुल्लिंग ठरणार आहे.

ते वाचून निश्चितच कुणीतरी नवीन सिंधु नियतीला आव्हान द्यायला उभी ठाकेल.
तेच या आत्मचरित्ररूपी स्फुल्लिंगाचं खरंखुरं यश असेल !

( रामराव आदिक )

सौ. सिंधुताई सपकाळ

# मनोगत

'मी वनवासी' हे आत्मकथन माझं आहे. तरीही असलं खडतर जीवन एकमेव मीच करू शकले, असं मात्र नव्हे.

योगायोगाने मी दु:खाचे डोंगर चढले, अवघड वाटा ओलांडल्या पण अजूनही असंख्य अभागिनी तिकडे घाटातच पडून आहेत, त्यांचे रस्ते अवघड आहेत त्याचे काय?

तसं माझं सासुरवास नावाचं आयुष्य संपून बराच काळ लोटला, तरीही मन नकळत मागे वळतं आणि आठवतं, त्या काळी केलेली एकमेकींची विचारपूस.

सासूची नजर चुकवून पातळाच्या घोळात आणलेले भाकरीचे तुकडे तोडता तोडता रडायचं... अन् जंगलात खडकातील 'पाझर' असेल तिथलं पाणी घड्यात भरायचं.

खरंच डोळ्यातील घळघळते अश्रू तोंडातील 'चघळता' घास खारट करून जायचे तेव्हा. तीन तीन मैल प्यायच्या पाण्याकरिता 'अनवाणी' पायांनी केलेला पहाडी प्रवास आजही मला जसाच्या तसा आठवतो.

चालता चालता बोलायचं, आणि बोलता बोलता चालायचं. फक्त एवढ्याच वाटचालीत... होईल तेवढ्या जगलेल्या क्षणांच्या आणि भोगलेल्या मनाच्या जखमा, झाडाझुडपांच्या साक्षीनं सर्वजणी उलगडायच्या, तेव्हा केलेली चर्चेतील ती 'चिरफाड' आजही मला... जशीच्या तशी आठवते.

रात्री झोपेने डोळे जड झालेले, शरीर थकलेले, न पेलणारे जाते ओढत त्यात आयुष्याचे दाणे टाकून भरडत आणि गळालेले आशा-आकांक्षांचे पीठ सावडत मी तर जगले; पण अजूनही माझ्या असंख्य वनवासिनी आजही त्याच पद्धतीनं जगत आहेत. ते आता तरी संपावे असे वाटते.

आजही त्या माझ्या जिवाभावाच्या ‘सख्या’ मला भूतकाळात घेऊन जातात– माझ्याभोवती फेर धरतात– घसा फाटेस्तोवर हंबरतात– तेव्हा माझं दु:ख बेलगाम बनतं; आणि वाटतं, त्यांनी किती चालायचं निखाऱ्यावर, किती किती खायचे चटके, किती निघायचं जळून आणि पोळून?

बस्स! या ‘मी वनवासी’ च्या रूपानं त्यांच्याही दु:खाला कवटाळता यावं, म्हणून हा लेखन ‘प्रपंच’ केला. असंख्य नाजूक जीवनाचे पडदे फाडत प्रचंड वेगाने वाहणाऱ्या दुर्दैवाच्या ‘घणाघाती’ प्रवाहास मी शब्दरूपी बांध घातला एवढेच. कारण...

हा युगानुयुगे प्रवास चालू आहे ।
डोळ्यातील गंगा कडेकडेनी वाहे ।।
किती चटके बसले, तरी न म्हटले हायऽऽऽऽऽ
या शब्दाखेरीज माझ्यापाशी काय?

**सौ. सिंधूताई सपकाळ**